आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२० ऑगस्ट २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहारच्या मतदार याद्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर विरोधकांचा गदारोळ, संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब

- विरोधकांच्या गदारोळातच प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग विधेयक लोकसभेत सादर

- दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर जनसुनावणी दरम्यान हल्ला, हल्लेखोराला अटक

**आणि**

- मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर ओसरला, इतरत्र अजूनही संततधार सुरू असल्यानं जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

बिहारमधल्या मतदार यादांच्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. आज सकाळी लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षांनी पुनरीक्षणाच्या मुदद्यावर चर्चा करण्याची मागणी करत निदर्शनं सुरु केली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी निदर्शनं करणाऱ्या सदस्यांच्या वर्तनावर नाराजी व्यक्त केली. मात्र विरोधी पक्षांनी निषेध सुरू ठेवल्यामुळे सभापतींनी लोकसभेच कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ लोकसभेत सादर केलं. ऑनलाईन गेमिंगमुळे होणारे दुष्परीणाम रोखणं, हे या विधेयकाचं उद्दीष्ट आहे. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही काहीस समान चित्र पहायला मिळालं. विविध राजकीय पक्षांकडून १८ स्थगन प्रस्ताव मिळाले असून हे प्रस्ताव फेटाळले असल्याचं, उपसभापती हरिवंश यांनी सांगितलं. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. उपसभापतींनी शून्य प्रहर पुकारला, मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी राज्यसभेचं कामकाज प्रथम दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

<><><><><>

विरोधकांच्या गदारोळातच, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग विधेयक, २०२५ लोकसभेत मांडलं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देणं आणि त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार केली जाईल. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं. याद्वारे, अशा गेम्समध्ये फसवणूक होऊन नागरिकांवर, विशेषतः तरुणांवर होणारे सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि गोपनीयतेशी संबंधित दुष्परिणाम टाळायला मदत होईल.

<><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी आज संसद भवनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा, किरेन रिजिजू यांसह भाजपचे अन्य नेते आणि रालोआतल्या घटक पक्षांचे खासदार उपस्थित होते. आपला अर्ज दाखल दाखल करण्यापूर्वी सी. पी. राधाकृष्णन यांनी

यांनी संसद भवन संकुलातल्या प्रेरणास्थळावर भारताच्या विविध नेते आणि स्वातंत्र्यसैनिकांना पुष्पांजली अर्पण केली. उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पुढच्या महिन्याच्या ९ तारखेला होणार आहे. माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी हे इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत.

<><><><><>

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर आज सकाळी सुरु असलेल्या जनसुनावणीदरम्यान हल्ला झाला. या आरोपीला पकडण्यात आलं असून, त्याची चौकशी सुरु आहे. दरम्यान रेखा गुप्ता यांची प्रकृती स्थिर असल्याचं दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेव यांनी सांगितलं आहे. भारतीय जनता पक्षानं या हल्ल्याचा निषेध केला आहे. तर दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आतिषी यांनीही या हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा तसंच आदोलन करण्याचा अधिकार आहे, मात्र कोणालाही हिंसा करण्याचा अधिकार नसल्याचं आतिषी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २२ तारखेला बिहारमध्ये गया इथं औंटा-सिमारिया प्रकल्पाचं उद्घाटन करणार आहेत. या प्रकल्पात पाटणा जिल्ह्यातल्या मोकामा आणि बेगुसराय यांना जोडणाऱ्या गंगेवरच्या पुलाचा समावेश आहे. हा पूल जुन्या रेल्वे आणि रस्ता वाहतुसाठी उभारलेल्या राजेंद्र सेतू या पुलाला समांतर असेल, अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिली आहे. हा नवीन पूल उत्तर बिहार आणि दक्षिण बिहारच्या जिल्ह्यांमधल्या वाहतुकीचं अंतर कमी करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या २०१७मध्ये या प्रकल्पाची पायाभरणी केली होती.

<><><><><>

महाराष्ट्रात मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर आज सकाळपासून ओसरू लागला आहे. मात्र, पालघर, कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, अकोला, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कायम असल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबईत पाऊस ओसरल्याने जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वे गाड्या काही प्रमाणात उशिराने धावत आहेत. सखल भागात अद्यापही पाणी साठलं असलं तरीही बेस्ट बस सेवा सुरळीत सुरु आहे. मोनोरेल सेवा काल संध्याकाळी काही ठिकाणी बंद पडली होती परंतु ती आज सकाळपासून सुरु झाली आहे. उपमुख्यमंती अजित पवार यांनी आज मंत्रालयातल्या राज्य आपत्ती नियंत्रण कक्षाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. हवामान विभागाने मुंबई, पालघर आणि रायगड जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला असून ठाणे , पुणे, नाशिक आणि सातारा जिल्ह्याला रेड अलर्ट दिला आहे. राज्यातल्या अनेक नद्या धोक्याच्या पातळीच्या वरून वाहत असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. पूरपरिस्थितीमुळे राज्यात गेल्या २४ तासांत १० जणांचा मृत्यू झाल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत काल संध्याकाळी म्हैसूर कॉलनी आणि भक्ती पार्क स्थानकांदरम्यान बंद पडलेल्या मोनोरेलमधून प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी चार तास सुरु असलेल्या बचावकार्यातून ५०० हून अधिक प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं. नादुरुस्त मोनोरेलमध्ये वीज आणि वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्यानं काही प्रवाशांचा श्वास गुदमरला. त्यापैकी १४ जणांना घटनास्थळी उपचारानंतर घरी सोडण्यात आलं, तर एका मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या घटनेची चौकशी केली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशाच्या आग्नेय भागात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यानं उत्तर कर्नाटकात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बेळगाव आणि उत्तर कन्नड जिल्ह्यांमध्ये सतत जोरदार वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

उत्तराखंडाच्या विविध भागात गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाचा जोर आज कमी झाला आहे. हवामान खात्यानं येत्या काही दिवसांत पुन्हा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली असून येलो अलर्ट जारी केला आहे. पुढचे तीन दिवस उत्तराखंड राज्यात अनेक भागात मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पाऊस आणि भूस्खलनामुळे उत्तराखंडमधले सुमारे १५० रस्ते बंद आहेत.

हिमाचल प्रदेशात अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडत आहे. खराब हवामानामुळे आज राज्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. धरणांच्या पाण्याची पातळी वाढत असल्यानं नियमितपणे पाणी सोडण्यात येत आहे. लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली आहे. नवी दिल्लीतील वीरभूमी इथं राजीव गांधी यांच्या समाधीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी पुष्पांजली वाहिली. संसदेच्या केंद्रीय सभागृहातही लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह इतर सदस्यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. मुंबईत राजभवनात देखील राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून त्यांना अभिवादन करण्यात आलं. त्यानंतर सर्व उपस्थितांना सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली.

<><><><><>

बल्गेरियात सामोकोव्ह इथे सुरू असलेल्या २० वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताच्या सुमित मलिक याने रौप्य पदक मिळवलं आहे. अंतिम फेरीत त्याला रशियाच्या मॅगोमेड ओडझामिरो याच्याकडून ५-८ असा पराभव पत्करावा लागला. महिला गटात सृष्टीने ६८ किलो गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तिने उपांत्य फेरीत जर्मनीच्या लॉरा कोहलर हिच्यावर ७-३ असा विजय मिळवला. तर ५७ किलो वजनी गटात तपस्या हिने जपानच्या सोवाका उचिदा हिला ४-३ असं पराभूत करून अंतिम फेरीत स्थान मिळवलं.

<><><><><>

स्पेनच्या नैर्ऋत्य आणि वायव्य भागात मोठ्या प्रमाणात वणवे पसरले असून २००६ नंतरचे हे भीषण वणवे असल्याचं सांगितलं जात आहे. कॅसेरस, गॅलिसिया आणि कॅस्टिला या भागांना वणव्यांचा सर्वात जास्त फटका बसला आहे. या वर्षात वणव्यांमुळे आतापर्यंत ३ लाख ८२ हजार हेक्टर जंगल जळून खाक झाल्याचं युरोपियन फॉरेस्ट फायर इन्फॉर्मेशन सिस्टमने म्हटलं आहे. यामुळे स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ देशात नागरी संरक्षण आणीबाणी जाहीर करण्याचा विचार करत आहेत.

//<><><><><>//